भुसंपादन निर्देशन अर्ज क्र.०८/२००९ मधील अर्ज नि.क्र. ३२ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज सामनेवाला क्र.१ करीता त्यांचेविरुद्ध निर्देशन अर्ज त्यांच्या गैरहजेरीत चालविण्याचा झालेला आदेश दि.३०.०८.२०१४ रद्द होवून त्यांना निर्देशन अर्जामध्ये हजर करुन घेण्यासाठी दिलेला आहे. त्यांनी अर्जात शासकीय कामामुळे त्यांना वेळेत निर्देशन अर्जात हजर राहता आले नाही. त्यामुळे त्यांचेविरुद्ध सदरचा आदेश झालेला आहे. परंतु त्यांनी हजर राहण्यामध्ये मुद्दामहून टाळाटाळ किंवा हलगर्जीपणा केलेला नाही. निर्देशन अर्जामध्ये कायदेशीर व तांत्रीक मुद्दे उपस्थित होणार आहेत. त्यामुळे त्याचे निराकरण करण्यासाठी त्यांना कैफियत देवून त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. तसे न झाल्यास त्यांचे अपरिमित नुकसान होईल. करीता सदरचा आदेश रद्द करावा असे त्यांनी शेवटी कथन केले आहे.

२. अर्जावर अर्जदारांकरीता त्यांचे विदवान विधीज्ञांनी खुलासा देवून अर्ज खरा व कायदेशीर नसून त्यांना मान्य व कबुल नाही असे म्हणणे मांडले आहे. निर्देशन अर्ज अत्यंत जुना असून त्यातील त्यांचा पुरावाही संपलेला आहे. त्यामुळे न्यायास अनुसरुन योग्य ते आदेश व्हावेत असे त्यांनी शेवटी म्हणणे मांडले आहे.

३. अर्ज, त्यावर अर्जदारांकरीता देण्यात आलेला खुलासा वाचला. निर्देशन अर्जातील कागदपत्रांची पाहणी केली. अर्जावरील दुय्यम सरकारी विधीज्ञ आणि अर्जदारांच्या विदवान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा निर्देशन अर्ज भुसंपादन अधिनियम १८९४ मधील कलम १८ खाली दाखल करण्यात आलेला आहे. त्यामध्ये अर्जदारांनी वाढीव भरपाईची मागणी केलेली आहे. सामनेवाला क्र.१ महाराष्ट्र शासनाकरीता विशेष भुसंपादन अधिकारी क्र.७ अहमदनगर आहे. त्यांनी सामनेवाला क्र.२ यांचेकरीता भुसंपादन केले आहे. सामनेवाला क्र.१ यांनी अंतिम निवाडयामध्ये भुसंपादनासाठी जो दर दिला होता त्याबाबत अर्जदारांनी आक्षेप घेवून वाढीव भरपाईची मागणी केली आहे. त्यामुळे भुसंपादन अधिकारी यांना त्यांची बाजू ठेवण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. परंतु त्यांना प्रस्तुत निर्देशन अर्जाची नोटीस (नि.१२) ची बजावणी दि.३०.०७.२०१४ रोजी होवूनही ते प्रकरणात हजर झाले नाहीत. त्यानंतर निर्देशन अर्ज त्यांच्या व सामनेवाला क्र.२ हेही हजर न झाल्याने त्यांच्या गैरहजेरीत चालविण्यात आला होता.

४. निर्देशन अर्जामध्ये अर्जदारांनी पुराव्याचे शपथपत्र दिले आहे. त्याची पडताळणी होणे अदयाप बाकी आहे. सामनेवाला क्र.१ त्यांनी भुसंपादनाचा अंतिम निवाडा केलेला आहे. त्यामुळे नैसर्गिक न्याय तत्वाने त्यांना बाजू मांडण्याची संधी देणेकरीता

त्यांचेविरुद्ध झालेला निर्देशन अर्ज त्यांचे गैरहजेरीत चालविण्याचा आदेश दि.३०.०८.२०१४ रद्द करणे योग्य होणार आहे. त्यांनी अर्जासोबतच त्यांची कैफियतही दिली आहे. त्यामुळे तीही स्वीकारणे न्याय योग्य होईल. करीता मी खालील आदेश करीत आहे.

## आदेश

१. अर्ज न्यायाच्या दृष्टीने मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाला क्र.१ यांचेविरुद्ध झालेला निर्देशन अर्ज त्यांचे गैरहजेरीत चालविण्याचा आदेश दि. ३०.०८.२०१४ न्यायाच्या दृष्टीने रद्द करण्यात येतो आणि त्यांनी दिलेली कैफियत स्वीकारण्यात येते.

Digitally signed by Pravin Panditrao Modi
Date: 2020.02.27 17:38:44 +0530

राहाता. (प्रविण पं.मोदी)

दि.२७.०२.२०२०. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,

राहाता.